# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com  Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. परदेशी शिष्यवृत्ती/२०२१-२२/(७६६५/२१)/शिष्यवृत्ती/ 3969 दिनांक : ०१.११.२०२१

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२१-२२ करिता अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : - १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१.

३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६४ दि. २१ सप्टेंबर, २०२१.

४. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक दि. २२.०९.२०२१.

५. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०२१/परदेशी शिष्यवृत्ती योजना/१०९१९ दि. ६.१०.२०२१.

६. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/८७ दि. १८ ऑक्टोबर, २०२१.

७. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/१०१ दि. १ नोव्हेंबर, २०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ४.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागातील खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना संदर्भाधिन क्र. २ च्या

दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताची सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने **अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) होती. तथापि सदरची मुदत वाढवून, उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक ९ नोव्हेंबर, २०२१ अशी करण्यात येत आहे.**

**तरी आपणांस कळविण्यात येते की, अर्ज तपासणी व स्वीकृती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयात दि. ९ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीमध्ये उपस्थित रहावे.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.
२. डॉ. अभय वाघ, तंत्रशिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९

ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :**

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/१०१ दिनांक : 01 NOV 2021

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...**

**संदर्भ :** १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६८/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६३ व ६४, दिनांक २१ सप्टेंबर, २०२१

३) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/८७ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून,संदर्भाधिन दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची योजना काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताची जाहिरात दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची वाढीव कालमर्यादा दिनांक १ नोव्हेंबर २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची वाढीव कालमर्यादा दिनांक २ नोव्हेंबर २०२१, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. विद्यार्थ्यांना शेवटची संधी म्हणून सदरची कालमर्यादा वाढवून आता online पद्धतीने अर्ज करण्याची कालमर्यादा दिनांक १ नोव्हेंबर २०२१ वरुन दिनांक ९ नोव्हेंबर, २०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक २ नोव्हेंबर २०२१ वरुन दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाढविण्यांत येत आहे.

तसेच उपरोक्त वेळापत्रकानुसार सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज तपासणी व स्विकृती करुन सर्व अर्ज एकत्रित करुन **दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१** रोजी तंत्रशिक्षण संचालनालयात हस्तदेय जमा करण्यांत यावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे

२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/ औरंगाबाद/अमरावती

# उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२१-२२ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीचा सुधारित कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दि. २१ सप्टेंबर २०२१ ते<br>दि. ९ नोव्हेंबर २०२१<br>( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दि. २३ सप्टेंबर २०२१ ते<br>दि. १० नोव्हेंबर २०२१<br>(सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |